**ठळक बातम्या**

- भारत आणि मॉरिशस यांच्यात ४ सामंजस्य करार, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांची मॉरिशसचे प्रधानमंत्री नवीनचंद्र रामगुलाम यांच्याशी वाराणसीत चर्चा

- जीएसटीतल्या दरकपातीनंतर कमी होणाऱ्या दरांची माहिती दुकानात लावण्याच्या केंद्र सरकारच्या विक्रेत्यांना सूचना

- छत्तीसगडमध्ये सुरक्षा दलांबरोबरच्या चकमकीत १० नक्षलवादी ठार, २६ जणांना अटक, १६ नक्षलवाद्यांचं आत्मसमर्पण

आणि

- भारत - अमेरिका व्यापार कराराच्या पहिल्या टप्प्याला नोव्हेंबरपर्यंत अंतिम स्वरुप येईल असा विश्वास केंद्रीय वाणिज्य मंत्री पीयुष गोयल यांच्याकडून व्यक्त

**<><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज वाराणसी इथं मॉरिशसचे प्रधानमंत्री नवीनचंद्र रामगुलाम यांच्याशी द्विपक्षीय चर्चा केली. यावेळी भारत आणि मॉरीशस यांच्यात चार सामंजस्य करार झाले. विज्ञान आणि तंत्रज्ञान क्षेत्रात सहकार्याचा करार, राष्ट्रीय सागरीविज्ञान संस्था आणि वैज्ञानिक औद्योगिक संशोधन परिषदेचा मॉरिशसच्या सागरीविज्ञान संस्थेबरोबरचा करार, प्रशासकीय सुधारणासाठी उभय देशातल्या कार्मिक आणि निवृत्तीवेतन विभागांमधला करार, तसंच दूरसंवाद, आणि अंतराळविज्ञान क्षेत्रात सहकार्यासाठीचा करार यांचा त्यात समावेश आहे. याखेरीज , मॉरिशसमधल्या ऊर्जा आणि पायाभूत सुविधा प्रकल्पांना भारताकडून अर्थसहाय्य, आणि जलसंसाधन क्षेत्रात सहकार्य या विषयीच्या आणखी ३ समझोत्यांवर आज स्वाक्षऱ्या झाल्या.

उभय राष्ट्रांमधले संबंध दृढ होत आहेत. भारत आणि मॉरिशस केवळ भागीदार नव्हे तर एका कुटुंबाचे सदस्य आहेत असं बैठकीनंतर संयुक्त संबोधनात प्रधानमंत्री मोदी म्हणाले. भारताबाहेरचं पहिलं जनऔषधी केंद्र मॉरिशसमधे सुरू होत असल्याची माहिती त्यांनी

दिली. ऊर्जा सुरक्षा हा उभय देशातल्या संबंधांचा आधारस्तंभ आहे असं सांगताना प्रधानमंत्री म्हणाले....

**- - होल्ड- प्रधानमंत्री - बाइट - -**

सागरी वाहतुकीची सुरक्षा, चांचेगिरी, आणि अमली पदार्थांची तस्करी या आव्हानांना सामोरं जाण्यासाठी भारत आणि मॉरिशस एकत्र येऊन प्रयत्न करत असल्याचं परराष्ट्र विभागाचे सचिव विक्रम मिस्री यांनी पत्रकार परिषदेत सांगितलं.

**<><><><>**

उत्तराखंडमधल्या अतिवृष्टी आणि पूरग्रस्त भागांकरता १ हजार २०० कोटी रूपयांचं अर्थसहाय्य प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी जाहीर केलं आहे. त्यांनी आज डेहराडूनला भेट दिली आणि पुरामुळे झालेल्या नुकसानीचा आढावा घेतला. पूर आणि पावसामुळे झालेल्या दुर्घटनांमध्ये मरण पावलेल्यांच्या कुटुंबांसाठी प्रत्येकी दोन लाख रूपये तर जखमींसाठी प्रत्येकी ५० हजारांची तातडीची मदत त्यांनी जाहीर केली.

या नैसर्गिक आपत्तीत अनाथ झालेल्या मुलांसाठी पीएम केअर्स निधी अंतर्गत व्यापक सहाय्य पुरवण्याची घोषणाही त्यांनी केली. प्रधानमंत्र्यांनी बाधित कुटुंबांची भेट घेतली. एनडीआरएफ, एसडीआरएफ आणि आपदा मित्र स्वयंसेवकांची त्यांनी भेट घेतली आणि त्यांच्या कामाचं कौतुक केलं.

**<><><><>**

केंद्रीय आरोग्यमंत्री जे. पी. नड्डा यांनी आज देशातल्या डेंग्यू आणि हिवताप संसर्गाच्या परिस्थितीचा आढावा घेतला. महाराष्ट्र आणि दिल्ली-एनसीआरसह अनेक राज्यांत झालेल्या पावसामुळे डेंग्यू आणि हिवतापाच्या रुग्णसंख्येत वाढ झाल्याच्या अहवालांच्या पार्श्वभूमीवर ही बैठक झाली. या आजारांचा संसर्ग टाळण्यासाठी आणि सार्वजनिक आरोग्याचं रक्षण करण्यासाठी  महानगरपालिका, पंचायती आणि स्थानिक संस्थांनी अधिक तीव्र प्रतिबंधात्मक आणि नियंत्रणात्मक उपाय अमलात आणावेत, असं आवाहन नड्डा यांनी केलं. सर्व राज्यांच्या आरोग्यमंत्र्यांनी स्वतः परिस्थितीचा आढावा घ्यावा आणि २० दिवसांच्या आत कृती आराखडा तयार करावा अश्या सूचना त्यांनी दिल्या.

**<><><><>**

सी. पी. राधाकृष्णन यांची उपराष्ट्रपतीपदी निवड झाल्यामुळे त्यांनी आज महाराष्ट्राच्या राज्यपाल पदाचा राजीनामा दिला. गुजरातचे राज्यपाल आचार्य देवव्रत यांच्याकडे महाराष्ट्राच्या राज्यपालपदाचा अतिरिक्त कार्यभार राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी सोपवला आहे.

<><><><>

जीएसटीतल्या दरकपातीनंतर कमी होणाऱ्या दरांची माहिती दुकानात लावण्याच्या सूचना केंद्र सरकारनं विक्रेत्यांना केल्या आहेत. घाऊक तसंच किरकोळ विक्रेते दोघांनाही हे फलक लावावे लागणार आहेत. तसंच जीएसटीच्या वेबसाइटवरही ही यादी प्रदर्शित करावी लागणार आहे. विविध उद्योग संघटनांच्या बैठकीत केंद्रीय अप्रत्यक्ष कर मंडळानं या सूचना केल्या. दरकपातीमुळं ग्राहकोपयोगी वस्तूंच्या किंमती किमान १० टक्क्यांनी तर वाहनांच्या किंमती १२ ते १५ टक्के कमी होण्याची शक्यता आहे. ग्राहकोपयोगी वस्तू निर्मात्या कंपन्यांनी या दरकपातीचा लाभ ग्राहकांपर्यंत योग्यरितीने पोहोचवण्याची खबरदारी घ्यावी, यासाठी सरकारनं त्यांना स्पष्ट निर्देश द्यावे अशी मागणीही संघटनांनी केली आहे.

<><><><>

छत्तीसगडमधल्या गरियाबंद जिल्ह्यातल्या मैनपूर भागात आज सुरक्षादलांबरोबर झालेल्या चकमकीत १० नक्षलवादी ठार झाले. मृतांमध्ये सुमारे १ कोटी रुपयांचं बक्षीस असलेला नक्षलवादी संघटनेचा कमांडर मनोज याचाही समावेश आहे. या भागातल्या जंगलात मोठया संख्येनं नक्षलवादी असल्याची माहिती मिळाल्यावर सुरक्षादलानं शोध मोहीम सुरु केली होती.

अशाच एका मोहिमेत, सुरक्षादलानं छत्तीसगडच्या बिजापूर जिल्ह्याच्या विविध भागातून २६ नक्षलवाद्यांना अटक केली. यापैकी ६ नक्षलवाद्यांवर सुमारे १३ लाख रुपयांचं बक्षीस जाहीर करण्यात आलं होतं. या नक्षलवाद्यांकडून स्फोटकं आणि शस्त्रास्त्र जप्त करण्यात आली.

छत्तीसगडच्या नारायणपूर जिल्ह्यात आज समाजाच्या मुख्य प्रवाहात सामील होण्यासाठी १६ नक्षलवाद्यानी पोलीस अधीक्षकांसमोर आत्मसर्पण केलं. राज्य सरकारनं या सर्वांना प्रोत्साहन निधी म्हणून ५० हजार रुपयांची मदत दिली.

<><><><>

पंजाबमध्ये फाझिल्का इथे सीमा सुरक्षा दल आणि पंजाब पोलिसांच्या पथकाने केलेल्या संयुक्त कारवाईत दोन शस्त्रास्त्र तस्करांना अटक करण्यात आली. या तस्करांकडून २७ पिस्तुलं आणि ४७० जिवंत काडतुसं सापडली आहेत. हे दोघेही सीमेपार शस्त्रांची तस्करी करत होते. ही शस्त्रं पाकिस्तानमधून एका परदेशी संघटनेमार्फत आणली गेली होती आणि पंजाबमधल्या गुन्हेगारी टोळ्यांना पुरवण्यात येणार होती, अशी माहिती पंजाब पोलिसांनी दिली आहे.

**<><><><>**

भारत - अमेरिका व्यापार कराराच्या पहिल्या टप्प्याला येत्या नोव्हेंबरपर्यंत अंतिम स्वरुप येईल असं केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग मंत्री पीयुष गोयल यांनी म्हटलं आहे. ते आज पाटणा इथं बातमीदारांशी बोलत होते.  प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रंप यांनी गेल्या फेब्रुवारीत तशा सूचना दिल्या आहेत असं ते म्हणाले. या संदर्भात प्रधानमंत्र्यांचा ट्रंप यांच्याशी समाजमाध्यमावर मैत्रीपूर्ण संवाद झाल्याच्या पार्श्वभूमीवर गोयल यांनी ही माहिती दिली.

**<><><><>**

लष्कर, नौदल आणि हवाई दलातल्या महिला अधिकाऱ्यांच्या सागरीमार्गे होणाऱ्या पहिल्यावहिल्या जगप्रदक्षिणेला आज मुंबईतून सुरुवात झाली. संरक्षणमंत्री राजनाथ सिंग यांनी दूरस्थ पद्धतीनं IASV त्रिवेणी या शिडाच्या नौकेवरच्या मोहिमेला रवाना केलं. लष्करातल्या लेफ्टनंट कर्नल अनुजा वरुडकर या १० अधिकाऱ्यांच्या मोहिमेचं नेतृत्व करत आहेत. २६ हजार १०० नॉटिकल मैलांपेक्षा जास्त प्रवास करून पुढच्या वर्षी मे महिन्यात मुंबईत परतण्याचं त्यांचं नियोजन आहे.

**<><><><>**

देशासमोर सध्या उभ्या राहिलेल्या आव्हानावर तोडगा काढण्यासाठी आपण प्रयत्न करत असल्याचं नेपाळचे राष्ट्रपती रामचंद्र पौडेल यांनी म्हटलं आहे. संविधानाच्या चौकटीत राहून उपाय शोधताना देशात शांतता प्रस्थापित करणं तसंच कायदा आणि सुव्यवस्था सुनिश्चित करणं हे आपलं उद्दिष्ट आहे, असं ते म्हणाले.

विविध विद्यार्थी संघटनाच्या नेत्यांनी आज संयुक्त निवेदन प्रसारित करुन विद्यमान संसदेत नवीन सरकार स्थापन करावं आणि निवडणुका घेण्यासाठी पोषक वातावरण निर्माण

करण्याची मागणी केली. हंगामी सरकारच्या स्थापनेसाठी सुरू असलेल्या चर्चेत तरुणांचे प्रतिनिधी सहभागी आहेत तसंच अनेक तरुणांनी साफसफाई केली.

**<><><><>**

इंडोनेशियामधल्या बाली इथं अतिवृष्टीमुळे आलेल्या पुरात चौदा जणांचा मृत्यू झाला असून दोघे बेपत्ता आहेत. शेकडो घरं पाण्याखाली गेली असून सार्वजनिक वाहतूक ठप्प झाली आहे.

**<><><><>**

हाँगकाँग खुल्या बॅडमिंटन स्पर्धेत भारताच्या आयुष शेट्टीनं आज पुरुष एकेरीत तर सात्विकसाईराज रन्कीरेड्डी आणि चिराग शेट्टी या जोडीनं पुरुष दुहेरीत उपांत्यपूर्व फेरी गाठली.

**<><><><>**

पहिल्यावहिल्या दिव्यांग महिला टी ट्वेंटी क्रिकेट विश्वचषकासाठी भारतानं सोळा जणांचा संघ जाहीर केला आहे. या संघाचं नेतृत्व कर्णधार दीपिका टी सी ही करेल. तर उपकर्णधारपदाची धुरा महाराष्ट्राची गंगा कदम सांभाळणार आहे.

**//<><><><>//**